**राज्य शासकीय कर्मचाऱ्यांना घोषित केलेले स्वग्राम बदल करण्यासाठी अतिरिक्त संधी देणेबाबत**

**महाराष्ट्र शासन**
**वित्त विभाग**
**शासन निर्णय क्रमांक:- रप्रस-२०२५/प्र.क्र.९ /सेवा-५**
मंत्रालय, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मुबंई-४०००३२
दिनांक:- २६ मे, २०२६

<u>वाचा:-</u>

१. **वित्त विभाग, शासन निर्णय क्रमांक टिआरए-११६३/२७२६/व्हि, दिनांक २३ ऑक्टोबर,१९६३**
२. वित्त विभाग, शासन निर्णय क्रमांक टिआरए-११६४/९४/II/५, दिनांक ०३ जून,१९६४
३ वित्त विभाग, शासन निर्णय क्रमांक रप्रस-१११४/प्र.क्र.११/सेवा-५, दिनांक १० जून,२०१५

**<u>प्रस्तावना :</u>**

राज्य शासकीय कर्मचाऱ्यांना वरील संदर्भ क्र. १ येथील शासन निर्णयान्वये स्वग्राम रजा प्रवास सवलत अनुज्ञेय करण्यात आली असून सदर तरतूदी वेळोवेळी सुधारित करण्यात आल्या आहेत. सद्यस्थितीत स्वग्राम घोषित करण्यासाठी प्रथम नियुक्ती दिनांकापासून ६ महिन्यांच्या आत स्वग्राम घोषित करण्याची कालमर्यादा विहित केली असून सदर कालमर्यादेत स्वग्राम घोषित केल्यास संबंधित कर्मचाऱ्यास पुढील सेवा कालावधीत स्वग्राम बदलण्याची संधी एकदा अनुज्ञेय आहे. तथापि, नियुक्ती दिनांकापासून सहा महिने कालावधीनंतर स्वग्राम घोषित करणाऱ्या कर्मचाऱ्यास सदर स्वग्राम बदलण्याची संधी नाही. त्याकारणे महिला कर्मचाऱ्यांना विवाह वा तदनुषंगिक अन्य़ कौटुंबिक घटना किंवा पुरुष व महिला कर्मचाऱ्यांना शासकिय योजना वा नैसर्गिक आपत्तीमुळे ग्राम स्थलांतरण वा अन्य कौटुंबिक/ वैयक्तिक कारणास्तव स्वग्राम बदल होत असल्यास सदर स्वग्राम बदलण्याची संधी अनुज्ञेय होत नाही. त्याकारणे सदरहु कर्मचारी स्वग्राम रजा प्रवास सवलतीचा लाभ घेण्यापासून वंचित रहात आहेत. या प्रयोजनांमुळे स्वग्राम घोषित करण्याच्या कालमर्यादेची अट रद्द करणे योग्य नसल्याने शासनाने कर्मचाऱ्यांना स्वग्राम सवलत उपभोगण्याची संधी प्राप्त होत राहावी या दृष्टिकोनातून सदर तरतूद सुधारीत करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्यानुषंगाने शासनाने पुढील निर्णय घेतला आहे.:-

**<u>शासन निर्णय</u>:-** शासनाने कर्मचाऱ्यांना स्वग्राम सवलत उपभोगण्याची संधी संपूर्ण सेवा कालावधीत प्राप्त होत रहावी या दृष्टिकोनातून स्वग्राम घोषित करण्याबाबतची तरतूद पुढीलप्रमाणे सुधारीत करण्यात येत आहे:-

१. राज्य शासकीय कर्मचाऱ्याने शासन सेवेत प्रथम प्रवेश केल्या दिनांकापासून सहा महिन्यात स्वग्राम घोषित करणे बंधनकारक/अनिवार्य राहील. याबाबतच्या सूचनांचा समावेश नवनियुक्त अधिकारी / कर्मचारी यांच्या नियुक्ती आदेशातच नियुक्ती अधिकाऱ्याने करावा.

२. स्वग्राम बदलण्याची संधी राज्य शासकीय कर्मचाऱ्यास संपूर्ण शासन सेवा कालावधीत **एकदाच** अनुज्ञेय राहील. तथापि ज्या अधिकारी/कर्मचाऱ्यांनी यापुर्वी प्रथम नियुक्ती दिनांकापासून ६ महिन्याच्या आत स्वग्राम घोषित केले असून सहा महिन्यानंतर विवाह वा अन्य प्रयोजनामुळे प्रथम घोषित केलेल्या स्वग्रामात बदल केला असल्यास अशा कर्मचाऱ्यांनाही सदर शासन निर्णय निर्गमित झाल्याच्या दिनांकापासून पुढील सेवा कालावधीत स्वग्राम बदल करण्याची अतिरिक्त संधी उपलब्ध राहील.

३ अ) विहित कालमर्यादेनंतर स्वग्राम घोषित केलेल्या अविवाहित महिला / विवाहीत महिलांना, विवाह/ घटस्फोट/ वैध्यव्य/ परित्यक्ता/पुनर्विवाह या घटना प्रसंगास अनुसरुन स्वग्राम बदल झाला असल्यास, सदर शासन निर्णय निर्गमित झाल्याच्या दिनांकापासून ६ महिन्यांच्या आत स्वग्राम बदल करणे बंधनकारक राहील.

ब) अविवाहित महिला / विवाहीत महिलांना, सदर शासन निर्णय निर्गमित झाल्यानंतर विवाह/ घटस्फोट/ वैध्यव्य/ परित्यक्ता/पुनर्विवाह या घटना प्रसंगास अनुसरुन स्वग्राम बदल झाल्यास, सदर घटनेच्या दिनांकापासून ६ महिन्यांच्या आत स्वग्राम बदल करणे बंधनकारक राहील.

४ अ) विहित कालमर्यादेनंतर स्वग्राम घोषित केलेल्या शासकीय कर्मचाऱ्यांना, सदर शासन निर्णय निर्गमित होण्यापूर्वी विविध शासकीय योजनांमुळे वा नैसर्गिक आपत्तीमुळे ग्राम स्थलांतरण झाले असल्यास किंवा कौटुंबिक अडचणी वा मुलांचे शिक्षण याकारणे स्थावर मालमत्ता अन्य ठिकाणी घेऊन तेथे स्थायिक झाले असल्याने स्वग्राम बदल झाला असल्यास, सदर शासन निर्णय निर्गमित झाल्याच्या दिनांकापासून ६ महिन्यांच्या आत स्वग्राम बदल करणे बंधनकारक राहील.

ब) शासकीय कर्मचाऱ्यांना, सदर शासन निर्णय निर्गमित झाल्यानंतर विविध शासकीय योजनांमुळे वा नैसर्गिक आपत्तीमुळे ग्राम स्थलांतरण झाले असल्यास वा कौटुंबिक अडचणी वा मुलांचे शिक्षण याकारणे स्थावर मालमत्ता अन्य ठिकाणी घेऊन तेथे स्थायिक झाले असल्याने

स्वग्राम बदल झाल्यास, सदर घटनेच्या दिनांकापासून ६ महिन्यांच्या आत स्वग्राम बदल करणे बंधनकारक राहील.

५. मुद्दा क्र.३ व ४ मधील स्वग्राम बदलण्याचे प्रयोजन, नियुक्ती अधिकाऱ्यांना संदर्भ क्र १ येथील वित्त विभाग, शासन निर्णय दिनांक २३/१०/१९६३ मधील तरतूदीनूसार खातरजमा केल्यावर समर्थनीय वाटल्यास, ते सदर स्वग्राम बदल करण्यास मान्यता देतील.

६. स्वग्राम बदल घोषित करतेवेळी कर्मचाऱ्याने अर्जात स्वग्राम बदलाची सदरहू अतिरिक्त संधी आहे याचा उल्लेख करावा व सदर अतिरिक्त संधीचा उल्लेख मंजूरी प्राधिकाऱ्याने आदेशातही करावा व सेवापुस्तकातील नोंदीतही करावा.

२. सदर तरतूदी या शासन निर्णयाच्या दिनांकापासून लागू राहतील. स्वग्राम रजा प्रवास सवलतीबाबतच्या अन्य विद्यमान तरतूदी, अटी, शर्ती व कार्यपध्दती आहे त्याप्रमाणेच लागू राहतील.

३. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक क्र. २०२६०५२६१५३३४०२००५ असा आहे. सदर शासन निर्णय डिजिटल स्वाक्षरीने साक्षांकित करून निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Digitally signed by RAVINDRA SITARAM JARANDE
Date: 2026.05.26 17:16:29 +05'30'

**( र. सि. जरांडे )**
**सह सचिव, महाराष्ट्र शासन**

| | |
|---|---|
| १. राज्यपालांचे सचिव<br>२. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव<br>३. उपमुख्यमंत्री यांचे सचिव<br>४. सर्व मा. मंत्री व राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव<br>५. मा.विरोधी पक्ष नेता, विधान परिषद / विधान सभा, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई<br>६. सर्व सन्माननीय विधानसभा, विधान परिषद व संसद सदस्य<br>७. मंत्रालयीन सर्व विभाग<br>८. सर्व अपर मुख्य सचिव /प्रधान सचिव/सचिव मंत्रालय, मुंबई | ३५. निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई<br>३६. जिल्हा लेखा परीक्षा अधिकारी, स्थानिक निधी लेखा<br>३७. सर्व जिल्हा कोषागार अधिकारी,<br>३८. लेखा अधिकारी, वेतन पडताळणी पथक, मुंबई/नागपूर/पुणे/औंरगाबाद.<br>३९. संचालक, माहिती व जनसंपर्क विभाग, मंत्रालय, मुंबई,<br>४०. विशेष आयुक्त, महाराष्ट्र सदन, कोपर्निकस रोड, नवी दिल्ली,<br>४१. ग्रंथपाल, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय |

| | |
|---|---|
| ९. सचिव, मा.सभापती, विधान परिषद, विधानमंडळ, मुंबई<br>१०. सचिव, मा.अध्यक्ष, विधान सभा, विधानमंडळ, मुंबई<br>११. मंत्रालयीन सर्व विभागाच्या अधिपत्याखालील विभाग प्रमुख<br>१२. प्रबंधक, उच्च न्यायालय (मूळ शाखा),मुंबई.<br>१३. प्रबंधक, उच्च न्यायालय (अपील शाखा),मुंबई.<br>१४. सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, नवी मुंबई.<br>१५. सचिव,महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,मुंबई.<br>१६. प्रबंधक,लोक आयुक्त व उप लोक आयुक्त यांचे कार्यालय,मुंबई.<br>१७. मुख्य माहिती आयुक्त, महाराष्ट्र, मुंबई<br>१८. आयुक्त, राज्य माहिती आयोग,(सर्व)<br>१९. सचिव, राज्य निवडणूक आयोग,मुंबई.<br>२०. प्रबंधक, महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण,<br>२१. मुंबई/नागपूर/ औंरगाबाद.<br>२२. महासंचालक, यशदा, राजभवन आवार, बाणेर रोड, पुणे<br>२३. सर्व विभागीय आयुक्त.<br>२४. सर्व जिल्हाधिकारी<br>२५. सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषदा.<br>२६. महालेखापाल-१ (लेखा परीक्षा), महाराष्ट्र, मुंबई.<br>२७. महालेखापाल-१ (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र, मुंबई<br>२८. महालेखापाल-२ (लेखा परीक्षा), महाराष्ट्र, नागपूर<br>२९. महालेखापाल-२ (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र, नागपूर<br>३०. सिनियर रिसर्च ऑफिसर, पे-रिसर्च युनिट, भारत सरकार, वित्त मंत्रालय, (व्यय विभाग), खोली क्र.२६१, नॉर्थ ब्लॉक, नवी दिल्ली,<br>३१. संचालक, लेखा व कोषागारे, मुंबई<br>३२. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई<br>३३. संचालक, स्थानिक निधी लेखा परीक्षा, मुंबई,<br>३४. सहसंचालक, स्थानिक निधी लेखा परीक्षा, कोकण/पुणे/नाशिक/औरंगाबाद/अमरावती/नागपूर. | ग्रंथालय, सहावा मजला, विधान भवन, मुंबई - ४०० ०३२.<br>४२. बहुजन समाज पार्टी, डी-१ इन्सा हटमेंट, आझाद मैदान, मुंबई १<br>४३. भारतीय जनता पार्टी, महाराष्ट्र प्रदेश, सी.डी.ओ.बॅरॅक नं.१, योगक्षेम समोर, वसंतराव भागवत चौक,नरिमन पॉईंट, मुंबई २०<br>४४. भारतीय कम्युनिस्ट पार्टी, महाराष्ट्र कमिटी, ३१४,राजभवन, एस.व्ही.पटेल रोड,मुंबई ४<br>४५. भारतीय कम्युनिस्ट पार्टी (मार्क्सवादी), महाराष्ट्र कमिटी, जनशक्ती हॉल, ग्लोब मिल पॅलेस, वरळी, मुंबई १३<br>४६. इंडियन नॅशनल कॉंग्रेस, महाराष्ट्र प्रदेश कॉंग्रेस (आय) समिती, टिळक भवन, काकासाहेब गाडगीळ मार्ग, दादर, मुंबई २५<br>४७. नॅशनलिस्ट कॉंग्रेस पार्टी, राष्ट्रवादी भवन, फ्री प्रेस जर्नल मार्ग, नरिमन पॉईंट, मुंबई २१<br>४८. शिवसेना, शिवसेना भवन, गडकरी चौक, दादर, मुंबई २८<br>४९. वित्त विभागातील सर्व कार्यासने<br>५०. निवड नस्ती, वित्त विभाग (सेवा-५) |